**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.राजेंद्र भूपाल चव्हाण
चिंचवाड, ता.शिरोळ, जि.कोल्हापूर — अपीलकर्ता

**विरुध्द**

(१)**अपिलीय प्राधिकारी** तथा शिक्षणाधिकारी(माध्यमिक),
जिल्हा परिषद कोल्हापूर, जि.कोल्हापूर — उत्तरवादी
(२)**अपिलीय प्राधिकारी** तथा सचिव, श्री दत्तप्रसाद शिक्षण मंडळ,
जयसिंगपूर, धरणगुत्ती रोड, ता.शिरोळ, जि.कोल्हापूर
**जन माहिती अधिकारी** तथा मुख्याध्यापक, दि न्यू हायस्कूल,
चिचवाड, ता.शिरोळ, जि.कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २४८ / कोल्हापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि.११.१२.२००८ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.राजेंद्र भूपाल चव्हाण
चिंचवाड, ता.शिरोळ, जि.कोल्हापूर

(१)**अपिलीय प्राधिकारी** तथा शिक्षणाधिकारी(माध्यमिक),
जिल्हा परिषद कोल्हापूर, जि.कोल्हापूर श्री.श.शं.गोसावी

**जन माहिती अधिकारी** तथा मुख्याध्यापक, दि न्यू हायस्कूल,
चिंचवाड, ता.शिरोळ, जि.कोल्हापूर सौ.बी.डी.पाटील

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १.८.२००७ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. २२.१.२००८ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. १४.९.२००७ |
| ७ | अपिलीय प्राधिका-यांनी निर्णय दिल्याची तारीख | दि. १०.८.२००७ |
| ८ | माहिती-मागणीच्या अर्जाची (जोडपत्र अ) प्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि.१३.५.२००८ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. त्यावेळी उभय घटकांत एकमत न झाल्याने दि.११.१२.२००८ रोजी सुनावणी घेण्यात आली.

अपीलकर्ता श्री.राजेंद्र भूपाल चव्हाण यांनी मागितलेली विद्यार्थ्यांची नावे आदि माहिती देऊ नये, असे पालकांनी कळविले होते. त्यामुळे आधी नाकारली, तथापि त्यानंतर योग्य ते शुल्क भरून माहिती प्राप्त करून घेण्याबाबतचे पत्र पाठविले होते. त्यांनी शुल्क भरले नाही. माहिती न मिळाल्याची त्यांची तक्रार असल्यामुळे दि.२१.५.२००८ पर्यंत त्यांना माहिती देण्याचे 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'तील चर्चेत ठरले. त्यानुसार पुन्हा त्यांना लेखी कळविले. परंतु 'सध्या माहितीची गरज नाही', असे सांगून त्यांनी माहिती स्वीकारण्यास नकार दिला, असे लेखी निवेदन जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापिका, दि न्यू हायस्कूल, चिंचवाड, ता.शिरोळ जि.कोल्हापूर सौ.बी.डी.पाटील यांनी दि.२०.५.२००८ च्या पत्रान्वये आयोगाला सादर केले. ते रास्त असल्याचे अपिलीय प्राधिकारी तथा शिक्षणाधिकारी(माध्यमिक), जिल्हा परिषद कोल्हापूर, जि.कोल्हापूर श्री.श.शं.गोसावी यांनी नमूद केले. श्री. चव्हाण यांना पाठविलेल्या पत्राची जावक बारनिशीतील नोंदीची प्रत आयोगाला सादर करावी, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले. त्यानुसार श्री.चव्हाण यांना पत्र पाठविल्याची जावक बारनिशीतील नोंदीची व शिक्षणाधिकारी यांना सादर केलेल्या माहितीची प्रत जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापिका, दि न्यू हायस्कूल, चिंचवाड, ता.शिरोळ जि.कोल्हापूर सौ.बी.डी.पाटील यांनी आयोगाला दि.१७.१२.२००८ च्या

पत्रान्वये सादर केली. वस्तुतः शालेय विद्यार्थी / विद्यार्थिनींची जन्मतारीख, गाव आदि माहिती वैयक्तिक असून अपीलकर्त्यास ती नाकारण्याचा जन माहिती अधिकारी यांचा निर्णय योग्य होता. तरीही जन माहिती अधिकाऱ्यांनी माहिती तयार करून कळविले असतानाही न स्वीकारण्याची अपीलकर्त्याची कृती योग्य नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**पुणे**
**दि.२१.१२.२००९**

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११००१

श्री. संभाजी पांडुरंग भोसले
मु. पो. जाखले, ता. पन्हाळा, **अपीलकर्ता**
जि. सोलापूर

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा** सचिव, **उत्तरवादी**
श्री. गोपाळेश्वर शिक्षण प्रसारक मंडळ,
जाखले, ता. पन्हाळा, जि. कोल्हापूर

**जन माहिती अधिकारी तथा** मुख्याध्यापक,
जाखले हायस्कूल, जाखले, ता. पन्हाळा, जि. कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २४९ / कोल्हापूर |
| २ | विशेष अपील निर्गत कार्यक्रम | दि. १३.५.२००८ |
| ३ | **उपस्थित**<br><br>**अपीलकर्ता :-** श्री. संभाजी पांडुरंग भोसले<br>मु. पो. जाखले, ता. पन्हाळा, जि. सोलापूर<br><br>**जन माहिती अधिकारी तथा** मुख्याध्यापक,<br>जाखले हायस्कूल, जाखले, ता. पन्हाळा, जि. कोल्हापूर | |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ८.९.२००६ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि. ९.१०.२००६ |
| ६ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती** - दिनांक १३.६.१९८६ ते ३१.५.२००६ अखेर मूळ सेवापुस्तिकेवरुन सर्व नोंदी सोबत दिलेल्या सेवापुस्तिकेमध्ये परिपूर्ण भरुन मिळावे. | |

# सुधारित आदेश

**वाचा :- आयोगाचे समक्रमांकाचे दि. ६.६.२००८ रोजीचे आदेश**

## विवेचन

उपरोक्त अपिलावर दि. ६.६.२००९ रोजी पारित केलेल्या आदेशानुसार अपीलकर्त्याचे मूळ सेवापुस्तक उपलब्ध करुन त्याची प्रत अथवा योग्य त्या नोंदी असलेली प्रत अपीलकर्त्यास आदेश मिळाल्यापासून १५ दिवसांत जन माहिती अधिकारी यांनी नि:शुल्क द्यावी व त्याबाबतचा पूर्तता अहवाल आयोगाला सादर करावा, असे आदेशित केले होते.

परंतु दि. ५.१०.२००९ रोजीच्या निवेदनाव्दारे अपीलकर्ता श्री. भोसले यांनी अद्यापपर्यंत पूर्तता अहवाल आयोगास सादर केलेला नाही, हे लक्षात घेता आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :-

## आदेश

अपीलकर्त्यास माहिती न दिल्याबद्दल जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, श्री. आनंदा बापूसाहेब नाईक यांना रु. २५,०००/- शास्ती लावण्यात येत आहे. सदरची शास्ती **फेब्रुवारी** २०१० मध्ये देय असलेल्या **जानेवारी** २०१० च्या वेतनापासून समान ५ मासिक हप्त्यात वसूल करुन '००७, इतर प्रशासकीय सेवा, ८००, इतर जमा रकमा, (१८) माहितीचा अधिकार (००७००१६१)' या लेखाशीर्षखाली जमा करण्याची कार्यवाही शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद कोल्हापूर यांनी करुन पूर्तता अहवाल आयोगाला सादर करावा. तसेच याबाबत श्री. नाईक यांच्या सेवापुस्तकात व गोपनीय अहवालात नोंद घेऊन त्याच्या छायांकित प्रती आयोगाला सादर कराव्यात, ही जबाबदारी शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद कोल्हापूर यांची राहील.

पुणे
दि. ३०-१२-२००९

(राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र, पुणे खंडपीठ)

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.प्रल्हाद मोतीराम नलवडे
अध्यक्ष, व्यंकटेश्वरा वडार युवक बहुउद्देशिय कल्याणकारी
विकास संस्था, सूर्यवंशी मळा, वडार गल्ली, कराड, जि.सातारा — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा उपआयुक्त तथा प्रादेशिक संचालक,
नगरपालिका प्रशासन, पुणे विभाग, पुणे — उत्तरवादी

**जना माहिती अधिकारी** तथा मुख्याधिकारी,
कराड नगरपरिषद, ता.कराड, जि.सातारा

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २४९ / सातारा |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२१.१.२००९ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.प्रल्हाद मोतीराम नलवडे
अध्यक्ष, व्यंकटेश्वरा वडार युवक बहुउद्देशिय कल्याणकारी
विकास संस्था, सूर्यवंशी मळा, वडार गल्ली, कराड, जि.सातारा

**अपिलीय प्राधिकारी** तथा उपआयुक्त तथा प्रादेशिक संचालक,
नगरपालिका प्रशासन, पुणे विभाग, पुणे प्रतिनिधी श्री.सुभाष गोसावी

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.२७.६.२००७ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. २६.७.२००७ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. ७.८.२००७ |
| ७ | अपिलीय प्राधिका-यांनी निर्णय दिल्याची तारीख | दि. २४.९.२००७ |
| ८ | माहिती-मागणीच्या अर्जाची (जोडपत्र अ) प्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि.२१.८.२००८ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. त्यावेळी जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी गैरहजर राहिल्याने दि.२१.१.२००९ रोजी सुनावणी घेण्यात आली.

सन १९७८ ते २००७ या कालावधीतील वडार समाजाच्या सार्वजनिक देवस्थानाच्या जागेबाबतची भोगवटादारांची नावे मिळाली नाहीत. दिड वर्षाचा कालावधी होऊनही आपल्याला माहिती दिली जात नाही, अशी तक्रार अपीलकर्ता श्री.प्रल्हाद मोतीराम नलवडे यांनी केली.

जन माहिती अधिकारी तथा मुख्याधिकारी, कराड नगरपरिषद, ता.कराड, जि.सातारा यांनी श्री.नलवडे यांना माहिती दिली. त्यामुळे अपिलीय प्राधिकारी तथा उपआयुक्त तथा प्रादेशिक संचालक, नगरपालिका प्रशासन, पुणे विभाग, पुणे यांनी त्यांचे अपील फेटाळले. सन १९९० ते २००१ पर्यंतचे नगराध्यक्ष व उपनगराध्यक्ष यांच्या नावापासून अनेक बाबींची माहिती श्री.नलवडे यांनी मागितली होती. आवश्यक तर श्री.नलवडे यांनी नगरपरिषद कार्यालयात जाऊन सर्व कागदपत्रांचे अवलोकन करावे असा निर्णय अपिलीय प्राधिकारी तथा उपआयुक्त तथा प्रादेशिक संचालक, नगरपालिका प्रशासन, पुणे विभाग, पुणे श्री.एस.जे.कोचे यांनी दिला. त्याप्रमाणे त्यांनी कागदपत्रांची पाहणी केली. उच्च न्यायालयाच्या स्थगिती आदेशाची प्रत उपलब्ध नसल्यामुळे ती पाहण्यास मिळाली नाही, असे नमूद करून श्री.नलवडे यांनी सर्व माहितीची पोहोच दिली आहे, असे अपिलीय प्राधिकारी तथा उपआयुक्त तथा प्रादेशिक संचालक, नगरपालिका प्रशासन, पुणे विभाग, पुणे यांचे प्रतिनिधी श्री.सुभाष गोसावी यांनी नमूद केले.

ऊर्वरित माहिती तीन दिवसांत अपीलकर्त्यास देण्यात यावी, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले. त्यानुसार दुसऱ्याच दिवशी दि.२२.१.२००९ रोजीच्या पत्रान्वये पूर्तता करण्यात आल्याचा अहवाल अपिलीय प्राधिकारी तथा उपआयुक्त तथा प्रादेशिक संचालक, नगरपालिका प्रशासन, पुणे विभाग, पुणे यांच्यातर्फे श्री.सुभाष गोसावी यांनी दि.२१.२.२००९ च्या पत्रान्वये आयोगाला सादर केला.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**पुणे**
**दि.२२.१२.२००९**

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.राजेजीराव विठ्ठलराव नाईक निंबाळकर
'विराम' गोळीबार मैदान, फलटण, ता.फलटण, जि.सातारा — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा तहसीलदार, फलटण,
ता.फलटण, जि.सातारा — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा निवासी नायब तहसीलदार, फलटण,
ता.फलटण, जि.सातारा

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २५+२६ / सातारा |
| २ | सुनावणीची तारीख | दि.१०.१२.२००८ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.राजेजीराव विठ्ठलराव नाईक निंबाळकर
'विराम' गोळीबार मैदान, फलटण, ता.फलटण, जि.सातारा

**अपिलीय प्राधिकारी** तथा तहसीलदार, फलटण, ता.फलटण, जि.सातारा
श्री.हिम्मत खराडे

**जन माहिती अधिकारी** तथा निवासी नायब तहसीलदार, फलटण, ता.फलटण, जि.सातारा
विद्यमान-श्री.एस.एम.हेरवाडे, तत्कालीन-श्री.पी.बी.बिचकर

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २१.८.२००६ व १९.७.२००६ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. २३.८.२००६ व ७.९.२००६ |

| | | |
|---|---|---|
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. ९.९.२००६ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. १३.१०.२००६ व १६.१०.२००६ |
| ८ | माहिती-मागणीच्या अर्जाची (जोडपत्र अ) प्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि.१५.५.२००८ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. त्यावेळी उभय घटकांमध्ये एकमत न झाल्याने दि.१०.१२.२००८ रोजी सुनावणी घेण्यात आली.

आपल्याला शुल्क भरण्यास कळविलेली तारीख उलटून गेल्यानंतर आपल्याला पत्र पाठविले. असे का केले, याबाबतची माहिती अपीलकर्ता श्री.राजेजीराव विठ्ठलराव नाईक निंबाळकर यांनी मागितली होती. अपीलकर्त्यास माहिती देण्यात आली आहे. विहित मुदतीत शुल्काबाबत कळविले होते. पत्र उशिरा मिळाले तरी शुल्क भरल्यानंतर माहिती देण्यात आली असून हेतूपुरस्सर पत्र उशिरा का पाठविले, माहितीच्या अधिकारात असे पत्र पाठविण्याची तरतूद आहे का, अशी विचारणा करून श्री.नाईक निंबाळकर यांनी अपील केले. त्याची दखल घेऊन जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, फलटण, ता.फलटण, जि.सातारा यांना पत्रव्यवहाराबाबत दक्षता घेण्याचे आदेश देण्यात आले. जन माहिती अधिकाऱ्यांनी कोणत्याही गैर उद्देशाने कृती केलेली नाही, असे प्रतिपादन अपिलीय प्राधिकारी तथा तहसीलदार, फलटण, ता.फलटण, जि.सातारा श्री.हिम्मत खराडे यांनी लेखी व तोंडी केले. (अ.क्र.२५)

आपल्याला दिलेल्या कागदपत्रांच्या प्रती साक्षांकित करून दिलेल्या नाहीत, अशी तक्रार श्री.नाईक निंबाळकर यांनी केली. श्री.नाईक निंबाळकर यांच्या मूळ अर्जात साक्षांकित प्रतींची मागणी नसल्यामुळे मागितलेल्या कागदपत्रांच्या केवळ छायांकित प्रती देण्यात आल्या होत्या. कागदपत्रांच्या नकला हव्या असल्यास त्यासाठी संबंधित नियमावलीनुसार स्वतंत्र अर्ज करावा लागेल, हे त्यांना कळविले होते, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, फलटण, ता.फलटण, जि.सातारा श्री.एस.एम.हेरवाडे यांनी केले.

संबंधित प्रती साक्षांकित करून देण्याचे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले. त्यानुसार दि.११.१२.२००८ रोजी साक्षांकित प्रती (तीन प्रतीत) गाव कामगार तलाठी, राजाळे यांच्यामार्फत पाठविल्या. परंतु त्या घेण्यास श्री.नाईक निंबाळकर यांनी नकार दिला. तसेच तलाठ्याने त्यांच्या घरावर डकविण्यास गेला असता अपीलकर्त्याने त्याला विरोध केला, तलाठ्याने तसा पंचनामा केला आहे, असे जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, फलटण, ता.फलटण, जि.सातारा श्री.एस.एम.हेरवाडे यांनी दि.२०.१.२००९ च्या पत्रान्वये पंचनाम्याच्या व कागदपत्रांच्या प्रतींसह आयोगास अवगत केले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपिले निकाली काढण्यात येत आहेत.

**पुणे**
**दि.२१.१२.२००९**

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**राज्य माहिती आयुक्त, पुणे विभाग, पुणे राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
विधान भवन समोर, पुणे ४११ ००१

श्री. दत्तु नागोजी हदगल
मु.पो.कुदनूर, ता.चंदगड, जि. कोल्हापूर
अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा गट विकास अधिकारी, वर्ग-१, पंचायत समिती, चंदगड, जि. कोल्हापूर
उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत, कुदनूर, ता. चंदगड, जि. कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २५० / कोल्हापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ११.१२.२००८ |
| ३ | उपस्थित | |

**अपीलकर्ता** श्री. दत्तू नागोजी हदगल
मु.पो.कुदनूर, ता.चंदगड, जि. कोल्हापूर

**अपिलीय प्राधिकारी** तथा गट विकास अधिकारी, वर्ग-१, पंचायत समिती, चंदगड, जि. कोल्हापूर श्री. एच. पी. कांबळे

**जन माहिती अधिकारी** तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत, कुदनूर, ता. चंदगड, जि. कोल्हापूर श्री. आर. सी. पाटील
तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा
ग्रामसेवक श्री. ए. एस. गडदे

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २५.१.२००७ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. ५.२.२००७ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. १०.९.२००७ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. १०.१०.२००७ |
| ८ | माहिती-मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

आपण रहात असलेल्या गल्लीतील एका बाजूचे गटार बांधकाम केले, पण आपल्या घरासमोरील गटार बांधले नाही. तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत, कुदनूर, ता. चंदगड, जि. कोल्हापूर श्री. ए.एस.गडदे हे त्याला जबाबदार असून त्यांनी काही माहिती दिली नाही, अशी तक्रार अपीलकर्ता श्री. दत्तू नागोजी हदगल यांनी केली.

मूळ अर्जाप्रमाणे पूर्ण व ग्रामपंचायतीकडील अभिलेखानुसार योग्य माहिती दिली. नंतरच्या अपिलामध्ये श्री. हदगल यांनी मूळ अर्जापेक्षा वेगळे मुद्दे उपस्थित केले, असे प्रतिपादन तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत, कुदनूर, श्री. ए.एस.गडदे व विद्यमान जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत, कुदनूर, श्री. आर.सी.पाटील यांनी केले.

श्री. हदगल यांच्या घरासमोरील गटाराच्या बांधकामाचा विषय ग्रामपंचायतीच्या बैठकीत ठेऊन होणाऱ्या निर्णयानुसार कार्यवाही केली जाईल, असे विद्यमान जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत, कुदनूर, यांनी अपिलाच्या सुनावणीच्या वेळी नमूद केले होते. एक महिन्यात ऊर्वरित संपूर्ण माहिती देण्याचे आदेश आपण दिले होते, तसेच ग्रामसेवक श्री. आर.सी.पाटील यांच्यावर ठपका ठेऊन त्यांना समज देण्यात आली. मात्र श्री. हदगल यांचा विषय गटाराच्या बांधकामाचा; म्हणजे प्रशासकीय कार्यवाहीचा आहे, असे प्रतिपादन अपिलीय प्राधिकारी तथा गट विकास अधिकारी, वर्ग-१, पंचायत समिती, चंदगड, श्री. एच. पी. कांबळे यांनी केले. श्री. हदगल यांनी दाखल केलेली कागदपत्रे पाहता अपिलीय प्राधिकारी तथा गट विकास अधिकारी, वर्ग-१, पंचायत समिती, चंदगड यांचे प्रतिपादन रास्त असल्याचे दिसते.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

पुणे
दि. ३१.१२.२००९

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र * पुणे खंडपीठ *

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त
पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.रामचंद्र दत्तात्रय बन्ने
मु.पो.शिरटी, ता.शिरोळ, जि.कोल्हापूर — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा तहसीलदार, शिरोळ,
ता.शिरोळ, जि.कोल्हापूर — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा निवासी नायब तहसीलदार, शिरोळ,
ता.शिरोळ, जि.कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २५१ / कोल्हापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि.११.१२.२००८ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.रामचंद्र दत्तात्रय बन्ने
मु.पो.शिरटी, ता.शिरोळ, जि.कोल्हापूर

**अपिलीय प्राधिकारी** तथा तहसीलदार, शिरोळ,
ता.शिरोळ, जि.कोल्हापूर श्री.डी.एन.माने

**जन माहिती अधिकारी** तथा निवासी नायब तहसीलदार, शिरोळ,
ता.शिरोळ, जि.कोल्हापूर श्री.पी.एस.ढगे

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ४.८.२००७ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. ४.९.२००७ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. १.९.२००७ |
| ७ | अपिलीय प्राधिका-यांनी निर्णय दिल्याची तारीख | दि. १०.१०.२००७ |
| ८ | माहिती-मागणीच्या अर्जाची (जोडपत्र अ) प्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि.१३.५.२००८ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. त्यावेळी उभय घटकांमध्ये एकमत न झाल्याने दि.११.१२.२००८ रोजी सुनावणी घेण्यात आली.

गॅस एजन्सीने दिलेल्या गॅस कनेक्शनबाबतची माहिती शिरोळच्या तहसीलदार कार्यालयातील पुरवठा विभाग देत नाही. तसेच अपिलीय प्राधिकारी त्याची योग्य दखल घेऊन कार्यवाही करीत नाहीत. आपण मागितलेली माहिती अन्य प्राधिकरणाशी संबंधित असल्याचे विलंबाने कळवून गॅस कनेक्शन देण्याबाबतची जबाबदारी तहसीलदार कार्यालय टाळत आहे. सन २००० मध्ये आपण क्रमांक लावून गॅस ग्राहक म्हणून नोंद केलेली असताना संबंधित खात्याशी किंवा विभागाशी संपर्क साधून नियमाने आम्हाला गॅस कनेक्शन मिळवून देणे हे त्यांचे कर्तव्य असताना ते जबाबदारी टाळत आहेत, असे लेखी प्रतिपादन अपीलकर्ता श्री.रामचंद्र दत्तात्रय बन्ने यांनी केले असून त्यांचे प्रतिनिधी म्हणून श्री.प्रसाद गणपत धर्माधिकारी यांनी त्याचाच पुनरूच्चार केला.

श्री.बन्ने यांनी मागितलेली माहिती तहसीलदार कार्यालयाशी संबंधित नाही. गॅस कनेक्शन देणे हा आपल्या कार्यालयाच्या कक्षेतील विषय नाही. त्याबाबतची माहिती कोणाकडे मागावी, त्या प्राधिकरणाची माहिती मिळण्यास उशीर झाला. त्यानुसार संबंधित प्राधिकरणाकडे अर्ज वर्ग करून श्री.बन्ने यांना कळविण्यात आले, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, शिरोळ, ता.शिरोळ, जि.कोल्हापूर श्री.पी.एस.ढगे व अपिलीय प्राधिकारी तथा तहसीलदार, शिरोळ, ता.शिरोळ, जि.कोल्हापूर श्री.डी.एन.माने यांनी केले. ते रास्त असल्याचे

कागदपत्रांवरून स्पष्ट होते. श्री.बन्ने यांचे गॅस कनेक्शन नियमाने मिळण्याची मागणी हा प्रशासकीय कार्यवाहीचा विषय असून माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत त्याचा समावेश होत नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि.३१.१२.२००९

**राज्य माहिती आयुक्त, पुणे विभाग, पुणे राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
विधान भवन समोर, पुणे ४११ ००१

श्री. आबन महमंद सुतार — अपीलकर्ता
मु.पो.यड्राव, पार्वती इंडस्ट्रीज (काकडे मळा),
ता. शिरोळ, जि. कोल्हापूर

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा कार्यकारी अभियंता बांधकाम, जिल्हा परिषद, कोल्हापूर — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा उप अभियंता (बांधकाम), जिल्हा परिषद, उपविभाग हातकणंगले, जि. कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २५२ / कोल्हापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ११.१२.२००८ |
| ३ | **उपस्थित**<br><br>**अपीलकर्ता** — श्री. आबन महमंद सुतार, मु.पो.यड्राव, पार्वती इंडस्ट्रीज (काकडे मळा), ता. शिरोळ, जि. कोल्हापूर<br><br>**अपिलीय प्राधिकारी** तथा — कार्यकारी अभियंता बांधकाम, जिल्हा परिषद, कोल्हापूर श्री. जी.टी. पोवार<br><br>**जन माहिती अधिकारी** तथा — उप अभियंता (बांधकाम), जिल्हा परिषद, उपविभाग हातकणंगले, जि. कोल्हापूर श्री. एस.आर.प्रभुणे | |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १.६.२००७ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. २५.६.२००७ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. १८.७.२००७ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. १.८.२००७ |
| ८ | माहिती-मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

आपल्याला विलंबाने माहिती दिल्याबद्दल जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता (बांधकाम), जिल्हा परिषद, उपविभाग हातकणंगले, जि. कोल्हापूर यांच्यावर दंडात्मक कारवाई करावी, अशी मागणी अपीलकर्ता श्री. आबन महंमद सुतार यांनी केली आहे.

श्री. सुतार यांनी दि. ३१.५.२००७ रोजी केलेल्या अर्जाला दि. २५.६.२००७ च्या पत्राने उत्तर देऊन शुल्क कळविण्यात आले, परंतु शुल्क न भरता त्यांनी अपिलीय प्राधिकारी तथा कार्यकारी अभियंता बांधकाम, जिल्हा परिषद, कोल्हापूर यांच्याकडे अपील केले. त्यावेळी आपण दारिद्र्य रेषेखाली असल्याचे दाखल्यासह त्यांनी नमूद केले, त्यामुळे सुनावणीच्या दिवशीच दि. १३.८.२००७ रोजी त्यांना समक्ष माहिती देण्यात आली, असे श्री. सुतार यांच्या पोहोच असलेल्या पत्राच्या प्रतीसह जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता (बांधकाम), जिल्हा परिषद, उपविभाग हातकणंगले, जि. कोल्हापूर व अपिलीय प्राधिकारी तथा कार्यकारी अभियंता (बांधकाम), जिल्हा परिषद, कोल्हापूर यांनी निवेदन केले. ते लक्षात घेता माहितीबाबत विहित मुदतीत कार्यवाही करण्यात आली आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

पुणे
दि. ३१.१२.२००९

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त
पुणे खंडपीठ

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र * पुणे खंडपीठ *

**राज्य माहिती आयुक्त, पुणे विभाग, पुणे राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
विधान भवन समोर, पुणे ४११ ००१

डॉ. दिलीप मल्हारराव पाटील
४०८, मंगळवार पेठ, सातारा

अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा ~~जन संपर्क अधिकारी,~~ उप संचालक, आरोग्य सेवा,
पुणे मंडळ, पुणे

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा जन संपर्क अधिकारी,
उप संचालक, आरोग्य सेवा,
पुणे मंडळ, पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २५५ + ३२९ + ४८३ /सातारा |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २२.८. २००८ |
| ३ | **उपस्थित** | |

**अपीलकर्ता** डॉ. दिलीप मल्हारराव पाटील
४०८, मंगळवार पेठ, सातारा

**अपिलीय प्राधिकारी** तथा उप संचालक, आरोग्य सेवा,
पुणे मंडळ, पुणे

**जन माहिती अधिकारी** तथा जन संपर्क अधिकारी, उप संचालक, आरोग्य सेवा,
पुणे मंडळ, पुणे

| अपील क्रमांक | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | प्रथम अपिलाची तारीख | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख |
|---|---|---|---|---|
| २५५ / सातारा | २७.१.२००७ | २१.३.२००७ | १७.३.२००७ | २१.३.२००७ |
| ३२९ / सातरा | २३.११.२००७ | -- | १.१.२००८ | -- |
| ४८३/ सातारा | १२.६.२००७ | -- | २७.७.२००७ | २०.११.२००७ |

माहिती-मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे.

## विवेचन

वैद्यकीय अधिकारी पदावरून आठ वर्षाच्या सेवेनंतर आपल्याला काढून टाकण्याच्या संदर्भात उप संचालक, आरोग्य सेवा कार्यालयाकडे आपण मागितलेली माहिती पूर्ण व योग्य दिली जात नाही. आपण मागणी केलेली कागदपत्रे उपलब्ध नसल्याचे सांगितले जाते. माहिती न देणाऱ्या अधिकाऱ्यावर कारवाई करावी, अशी मागणी अपीलकर्ता डॉ. दिलीप मल्हारराव पाटील यांनी केली.

सेवा समाप्तीच्या अनुषंगाने डॉ. पाटील गेल्या काही वर्षांपासून विविध स्वरूपाचे अर्ज करीत आले आहेत. माहितीच्या अधिकारातही अनेक अर्ज व अपिले त्यांनी केली असून उपलब्ध असलेल्या सर्व कागदपत्रांच्या व माहितीच्या प्रती त्यांना देण्यात आल्या आहेत. संचालक, आरोग्य सेवा, मुंबई यांच्या कार्यालयातील संबंधित संचिका डॉ. पाटील दाखवून त्यांच्या मागणीनुसार हव्या असलेल्या प्रती शुल्क आकारून देण्याचा आदेश आयोग डॉ. पाटील यांच्या अन्य अपिलात दिला होता. त्यानुसार दि. २४.९.२००८ रोजी पूर्तता करण्यात आली. जे कागदपत्र मुळातच नाहीत. त्यांच्या प्रती डॉ. पाटील वारंवार मागत आहेत, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा जन संपर्क अधिकारी, उप संचालक, आरोग्य सेवा, पुणे मंडळ श्री. सूर्यकांत एकनाथ कांडेकर यांनी केले.

वरील बाबी लक्षात घेता माहिती न मिळाल्याची अपीलकर्ता डॉ. दिलीप मल्हारराव पाटील यांची तक्रार अमान्य करण्यात येत आहे. आपल्यावर अन्याय झाला व नियमबाह्य पध्दतीने आपल्याला सेवेतून कमी करण्यात आले, अशी डॉ. पाटील यांची तक्रार आहे. ही बाब माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत निर्णयाची नाही, याची जाणीव आयोगाने डॉ.पाटील यांना पूर्वीही दिलेली आहे. या स्थितीत सर्व यंत्रणांचा वेळ व श्रम याचा अपव्यय न करण्याची समज डॉ. पाटील यांना पुन्हा देण्यात येत आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपिले अमान्य करण्यात येत आहेत.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ

पुणे
दि. २६.१२.२००९

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त
पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, पुणे विभाग, पुणे राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
विधान भवन समोर, पुणे ४११ ००१

सौ. जयश्री प्रसाद धर्माधिकारी — अपीलकर्ता
तर्फे श्री. प्रसाद ग. धर्माधिकारी
कलादालन, मु.पो.ता.शिरोळ, जि.कोल्हापूर

विरुध्द

**अपिलीय प्राधिकारी** तथा गट विकास अधिकारी वर्ग-१, पंचायत समिती, शिरोळ, ता. शिरोळ, जि. कोल्हापूर — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा ग्रामविकास अधिकारी, ग्रामपंचायत, शिरोळ ता. शिरोळ, जि. कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २५५ / कोल्हापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ११.१२.२००८ |
| ३ | **उपस्थित** | |

**अपीलकर्ता** — सौ. जयश्री प्रसाद धर्माधिकारी
प्रतिनिधी श्री. प्रसाद ग. धर्माधिकारी
कलादालन, मु.पो.ता.शिरोळ, जि.कोल्हापूर

**अपिलीय प्राधिकारी** तथा — गट विकास अधिकारी वर्ग-१, पंचायत समिती,
शिरोळ, ता. शिरोळ, जि. कोल्हापूर
श्री. एस.जे. पवार

**जन माहिती अधिकारी** तथा — ग्रामविकास अधिकारी, ग्रामपंचायत, शिरोळ
ता. शिरोळ, जि. कोल्हापूर श्री. ए.पी. पाटील

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २२.८.२००७ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. १५.१.२००८ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. २०.९.२००७ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. २.११.२००७ |

| ८ | माहिती-मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |
|---|---|

## विवेचन

आपण मागितलेली माहिती सविस्तर दिली नाही. अपिलीय प्राधिकारी तथा गट विकास अधिकारी वर्ग-१, पंचायत समिती, शिरोळ यांच्या निर्णयानंतर ती देण्यात आली व मूळ माहिती देण्यासही एक दिवस विलंब केला, अशी तक्रार अपीलकर्त्या सौ. जयश्री प्रसाद धर्माधिकारी यांचे प्रतिनिधी श्री. प्रसाद ग. धर्माधिकारी यांनी केली.

सौ. धर्माधिकारी यांनी मागितलेली माहिती तांत्रिक स्वरूपाची व भाष्य अथवा अन्वयार्थ यांची मागणी करणारी होती. ती सविस्तर द्यावी, असे आदेश अपिलीय प्राधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, शिरोळ यांनी दिल्यानंतर उप अभियंता, पंचायत समिती, बांधकाम विभाग, शिरोळ यांच्याकडून घेऊन देण्यात आली, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी श्री. ए.पी. पाटील व अपिलीय प्राधिकारी श्री. एस. जे. पवार यांनी केले.

'कार्यवाही योग्य की अयोग्य,' 'कृती बरोबर आहे का?' अशा स्वरूपाचे भाष्य व अन्वयार्थ यांची मागणी करणारे प्रश्न सौ. धर्माधिकारी यांनी 'माहिती' म्हणून विचारले आहेत. माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अन्वये अशी विचारणा 'माहिती' ठरत नाही. तथापि कामाचे सार्वजनिक स्वरूप लक्षात घेता सौ. धर्माधिकारी यांनी मागितलेली तांत्रिक स्वरूपाची स्पष्टीकरणात्मक माहिती देण्याचे आदेश अपिलीय प्राधिकारी तथा गट विकास अधिकारी वर्ग-१, पंचायत समिती, शिरोळ श्री. एस.जे. पवार यांनी दिले व त्यानुसार माहिती देण्यात आली, असे तत्कालीन अपिलीय प्राधिकारी तथा गट विकास अधिकारी वर्ग-१, पंचायत समिती, शिरोळ सौ. आर. आर. कुलकर्णी यांनी नमूद केले. उभय बाजूंची निवेदने व कागदपत्रे विचारात घेता ते रास्त आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

पुणे
दि. ३०.१२.२००९

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त
पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.व्ही.एन.चौरे
फ्लॅट क्र.डी-१, डिस्नी पार्क नरेन हिल्सजवळ, वानवडी, पुणे अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा सहजिल्हा निबंधक(निम्नस्तर)
व मुद्रांक जिल्हाधिकारी, पुणे ग्रामीण, पुणे उत्तरवादी

**जना माहिती अधिकारी** तथा दुय्यम निबंधक, वडगाव मावळ,
ता.मावळ, जि.पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २५७४ / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.१९.६.२००९ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.व्ही.एन.चौरे
फ्लॅट क्र.डी-१, डिस्नी पार्क नरेन हिल्सजवळ, वानवडी, पुणे

**अपिलीय प्राधिकारी** तथा सहजिल्हा निबंधक(निम्नस्तर)
व मुद्रांक जिल्हाधिकारी, पुणे ग्रामीण, पुणे श्री.इ.एस.पाटील

**जना माहिती अधिकारी** तथा दुय्यम निबंधक, वडगाव मावळ,
ता.मावळ, जि.पुणे श्री.अ.पां.काळे

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १५.७.२००८ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. ८.८.२००८ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. ५.९.२००८ |
| ७ | अपिलीय प्राधिका-यांनी निर्णय दिल्याची तारीख | दि. १४.१०.२००८ |
| ८ | माहिती-मागणीच्या अर्जाची (जोडपत्र अ) प्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि.२९.१.२००९ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. त्यावेळी अपीलकर्ता गैरहजर राहिल्याने दि.१९.६.२००९ रोजी सुनावणी घेण्यात आली.

मूळ दस्तासोबत दाखल केलेले ७/१२ उतारे व प्रतिज्ञापत्र याची प्रत आपल्याला मिळाली नाही, अशी तक्रार अपीलकर्ता श्री.व्ही.एन.चौरे यांनी केली.

श्री.व्ही.एम.चौरे यांनी मूळ अर्जात मागितलेल्या दस्ताच्या प्रती व अभिलेखाची पाहणी करू देण्याची मागणी केली होती. त्याबाबत कळविलेले शुल्क त्यांनी भरले नाही, त्यामुळे ती माहिती दिली नाही. शेतजमिन खरेदी करताना आपण नियमानुसार ७/१२ व प्रतिज्ञापत्र जोडलेले आहे, असे श्री.चौरे यांनी नमूद केले. सोबतचे ७/१२ उतारे, प्रतिज्ञापत्र आदि माहिती मूळ अर्जात मागितली नव्हती. प्रथम अपिलाच्या वेळी त्यांनी ती मागणी केली. ती देण्याचे आदेश अपिलीय प्राधिकारी तथा सहजिल्हा निबंधक(निम्नस्तर) व मुद्रांक जिल्हाधिकारी, पुणे ग्रामीण, पुणे यांनी दिले. तथापि संबंधित दस्तासोबत ७/१२ व प्रतिज्ञापत्र जोडलेले नाही,म्हणजे त्याला दस्ताचा भाग केलेला नाही, हे श्री.चौरे यांना कळवले, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा दुय्यम निबंधक, मावळ, ता.मावळ, जि.पुणे श्री.अ.पां.काळे यांनी केले. अभिलेखात नसल्याने संबंधित कागदपत्रांच्या प्रती देता आल्या नाहीत. दस्त नोंदणी झाल्यानंतर अभिलेखात ठेवली जाणारी पूरक कागदपत्रे ठराविक कालावधीनंतर नष्ट केली जातात. विषयांकित दस्त सन १९७४ मध्ये झालेला आहे. कार्यालयाने शोध घेतला आहे, तथापि अपीलकर्त्याची तयारी असल्यास सर्व अभिलेख त्यांना उपलब्ध करून

देता येतील. त्यांनी स्वतः शोध घ्यावा, त्यासाठी आपले कार्यालय सहकार्य करील, असेही श्री.चौरे यांना सांगण्यात आले आहे, असे निवेदन अपिलीय प्राधिकारी तथा सहजिल्हा निबंधक(निम्नस्तर) व मुद्रांक जिल्हाधिकारी, पुणे ग्रामीण, पुणे श्री.इ.एस.पाटील यांनी केले.

उपलब्ध कागदपत्रांच्या प्रती देण्याबाबत अपिलीय प्राधिकारी व जन माहिती अधिकारी यांनी प्रयत्न केले आहेत. त्यांच्या सूचनेप्रमाणे अपीलकर्त्याने आवश्यक तर अभिलेखात शोध घ्यावा. जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी पुन्हा शोध घेऊन अपीलकर्त्यास आठ दिवसांत कळवावे, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले. त्यानुसार पुन्हा अभिलेख पाहणी करूनही संबंधित कागदपत्रे उपलब्ध झालेली नाहीत, असे दि.७.८.२००९ च्या पत्रान्वये जन माहिती अधिकारी तथा दुय्यम निबंधक, मावळ, ता.मावळ, जि.पुणे श्री.अ.पां.काळे यांनी आयोगास कळविले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र
पुणे खंडपीठ

**पुणे**
**दि.३१.१२.२००९**